Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 841 – 844
DOI: 10.5281/zenodo.10281229

**Original Research Article**

# गांधीविचाराची वर्तमानकाळातील प्रासंगिकता

प्रा. डॉ. बालाजी गणपतराव भंडारे

सहयोगी प्राध्यापक तथा विभागप्रमुख, मराठी विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती ता.अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: basu.bhandari1@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

आज संपूर्ण विश्वाचे वर्तमान अस्थिर झालेले आपल्याला पाहायला मिळते.बाजारवाद सगळीकडे फोफावलेला दिसून येतो. स्पर्धा आणि अतिहव्यासामुळे माणूस अहिंसेचा अवलंब करताना दिसतो आहे.तो आता युद्धाच्या सीमेवर येऊन पोहोचला आहे.अशा वर्तमानात गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता तथा गरज किती महत्त्वाची आहे हे लक्षात यायला लागते. त्यामुळे जगाला युद्धाच्या सीमेवरून शांततेच्या मार्गावर केवळ गांधीविचारच घेऊन येऊ शकतात,या बाबीकडे आता जगाचे लक्ष वेधले आहे.

गांधीविचार म्हणजे कोणत्याही शोषण व्यवस्थेचा अहिंसेने केलेला विरोध. सर्वात अगोदर जनसेवा हीच ईश्वर सेवा, जमवण्यापेक्षा त्यागावर लक्ष,खोटेपणापेक्षा सत्य महत्त्वाचे आणि स्वतःपेक्षा देश आणि समाज मोठा या समग्र विचारांच्या एकत्रित रूपाला आपण गांधीविचार म्हणतो.असत्य स्वहित,धोखाधडी,स्वार्थ या विचारांना त्यागून संहिष्णुता, प्रेम,मानवता,बंधुता अशा आदर्श विचारांचे विस्तृत रूप म्हणजे गांधीविचार होय.सबंध विश्वामध्ये महाशक्तिशाली असणाऱ्या राष्ट्रांमध्ये विध्वंसक अशा शस्त्रास्त्रांची स्पर्धा दिसून येते.अशामध्ये विश्वशांतीच्या पुनर्स्थापनेसाठी व मानवी मूल्यांच्या पुनरुज्जीनासाठी गांधीविचाराचे महत्त्व पहिल्यापेक्षा अधिक प्रासंगिक आहेत असे म्हणावे लागेल.

महात्मा गांधीजी यांचा धर्म आणि नैतिकतेवर प्रचंड विश्वास होता. त्यांच्यामध्ये धर्म हा विविध प्रथांमध्ये अडकलेली बाब नसून ती एक शुद्ध आचरणाची विधी आहे.धर्म आणि राजनीति यांच्या निर्मितीच समाजाची उत्तम रचना तयार करण्यासाठी झालेली आहे. गांधीजींनी साधन आणि साध्य या दोन्हीच्या शुद्धतेवर भर दिलेला दिसून येतो. गांधीविचाराचे दर्शन हे केवळ राजनीतिक,नैतिक आणि धार्मिक तर आहेच.परंतु त्याबरोबरच ते तेवढेच

पारंपरिक,आधुनिक किंवा जटील असे आहे.पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव असूनही प्राचीन भारतीय संस्कृतीवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता.

गांधीजींच्या विचारावर विभिन्न ग्रंथांचा,व्यक्तीचा, सिद्धांतांचा प्रभाव दिसून येतो.त्यात भगवद्गीता, जैन धर्म, बौद्ध धर्म, बायबल, गोपाळ कृष्ण गोखले, टॉल स्टॉय,जॉन रस्किन आदींचा प्रभाव होता. टॉलस्टॉय यांचे पुस्तक 'द किंग्डम ऑफ गॉड इज विदिन यू'या ग्रंथाचा तर त्यांच्यावर अधिक प्रभाव होता. रस्किन यांच्या 'अन टू दिस लास्ट' वरून 'सर्वोदय' हा सिद्धांत त्यांनी आपल्या जीवनात अंगिकारला.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनासह स्पृश्य- अस्पृश्याचे निर्मूलन, हिंदू- मुस्लिम एकता, चरखा आणि खादीला प्रोत्साहन,ग्राम स्वराज्याचा प्रसार,प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य,ग्राम स्वराज्य या संकल्पनेचा प्रसार अशा कितीतरी बाबींचा त्यांनी पुरस्कार केला.गांधीजींच्या'माझे सत्याचे प्रयोग'ने तर अंतिमतः सत्याचाच विजय होतो आणि सत्याचा मार्ग हाच खरा मार्ग आहे,सत्याचा स्वीकार म्हणजे ईश्वराला स्वीकारणे होय.जर मनुष्याचा संघर्ष सत्यासाठी असेल, असत्याला त्यात किंचितही थारा नसेल तर सफलता त्याला मिळणारच, अशी खात्री त्यांना होती. राष्ट्रपिता म.गांधीजींनी आयुष्यभर काही तत्त्व जपली आणि ती प्रत्यक्षात अंमलात आणली, ज्यामुळे त्यांना जागतिक स्तरावर शांतीदूत म्हटले जाते.त्यापैकी काही तत्त्व पुढील प्रमाणे-

**१. सत्य**

गांधीजी सत्याला स्वतःचे प्राणतत्त्व मानतात,ईश्वर मानतात. सत्य हे त्यांच्यासाठी सर्वोपरी आहे. परंतु वर्तमानात शपथ सत्याची घेतली जाते आणि कर्म मात्र असत्याचे केले जातात. त्यामुळे समाजात अराजकता वाढताना दिसून येते.कितीही कठीण प्रसंग आला तरी सत्याच्या मार्गाने चालले पाहिजे तरच आपण नवनिर्माणाची दिशा ठरवू शकतो,देशाला पुढे घेऊन जाऊ शकतो, त्यासाठी सत्य अंगीकारणे आणि ते शेवटपर्यंत घेऊन जाणे ही बाब महत्त्वाची आहे असे गांधीजींना वाटते.

**२. अहिंसा**

अहिंसेची व्याख्या गांधीजी अतिशय सोप्या पद्धतीने करतात.त्यांच्या मते, मन, वचन किंवा शरीर यामध्ये कोणत्याही बाजूला दुःख न पोहोचविणे म्हणजे अहिंसा होय.त्यांच्या मते, अहिंसेच्या मार्गाने देखील आपण इतरांचे हृदय परिवर्तन करू शकतो.अहिंसेचा अर्थ रक्ताचा एकही थेंब न सांडणे एवढाच मर्यादित नाही तर आपल्या शब्दाने देखील कुणाचे मन न दुखावणे. अहिंसा म्हणजे प्रेम किंवा उदार अंत:करण होय. आजच्या जागतिक संघर्षमय परिस्थितीत अहिंसा किती आदर्शवत कल्पना आहे हे लक्षात येते. अहिंसेच्या मार्गाने विश्वस्तरावरील अनेक समस्या सोडविता येऊ शकतात.हे आजच्या वर्तमानकालीन परिस्थितीचे अवलोकन करून स्पष्टपणे सांगता येते.आज संपूर्ण विश्वामध्ये समस्येचे उत्तर हिंसेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जातो आहे.'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना फार व्यापक आहे, शेवटच्या घटकालाही सामावून घेणे ही बाब त्यात येते.परंतु आज चित्र वेगळे दिसते आहे.आजच्या वर्तमानकालीन परिस्थितीमध्ये अमेरिका,चीन, उत्तर कोरिया, इराण,इस्रायल, युक्रेन, रशिया या देशांमध्ये हिंसेचे माध्यमातून

शक्तिशाली बनण्याची जणू स्पर्धाच लागली आहे,परंतु हिंसेने जगात शांतता लाभू शकत नाही त्यामुळे केवळ विध्वंस होऊ शकतो.त्यासाठी गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाचा अवलंब करणे विश्वशांतीसाठी महत्त्वाचे आहे.

**३. सत्याग्रह**

सत्याग्रह याचा सुंदर आणि सोपा अर्थ असा की, असे कोणतेही कार्य जे अन्यायकारक आहे, इतरांना पीडा देणारे आहे किंवा शोषण करणारे आहे अशा व्यवस्थेच्या विरोधात शुद्ध अशा आत्मबलाचा प्रयोग करणे म्हणजे सत्याग्रह. ही बाब आहे स्वतः पीडा सहन करूनही आपले अधिकार सुरक्षित करणे आणि इतरांना कोणत्याही प्रकारची शाब्दिक अथवा शारीरिक त्रास न देण्याची. सत्याग्रहाची निर्मिती उपनिषद, बुद्ध महावीर यांच्याकडून व टॉयस्टॉय आणि रस्किन अशा महान दर्शनकारांकडून मिळालेली आहे. गांधीजींच्या मते,सत्याग्रह ही अशी बाब आहे, जी कितीही कठोर असलेल्या हृदयाला पाझर फोडतेच.सत्याग्रह हे दुर्बल माणसाचे शस्त्र असून शोषित व्यवस्थेच्या विरोधात शांततेच्या मार्गाने उगारलेले हत्यार आहे.आजच्या वर्तमानात सत्याग्रहाचा प्रयोग विविध ठिकाणी सनदशीर मार्गाने प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी केला जातो. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर शासनाच्या विविध नीती-नियमांना किंवा विविध आदेशामुळे निर्माण होणाऱ्या मतभेदाच्या परिस्थितीमध्ये विरोध म्हणून सत्याग्रहाचा प्रयोग सोयीचा वाटतो.

**४. सर्वोदय**

सर्वोदय या शब्दाचा सरळ अर्थ होतो सार्वजनिक प्रगती. हा शब्द गांधीजींना पहिल्यांदा जॉन रस्किन यांच्या पुस्तकात वाचला आणि तो आत्मसात केला. सर्वोदय हा एक असा विचार आहे जो वर्ग विहीन, जातीविहीन आणि शोषणमुक्त समाजाची स्थापना करतो.ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती व समूह, समूहाला आपला सर्वांगीण विकास साधता यावा. ज्यामध्ये वर्ग ,जाती,धर्म आणि भाषा यामुळे एखाद्या समाजाचा संहार अथवा बहिष्कार होणार नाही. गांधीजींच्या मते, मी माझ्या मागे कोणताही पंथ अथवा संप्रदाय सोडणार नाही.

आजच्या वर्तमान स्थितीमध्ये पूर्ण विश्व एका अशा समाजाचा शोध घेतो आहे जिथे शोषण, वर्ग, जाती, भेद यांना कोणतेही स्थान असणार नाही .कुठेही हिंसा होणार नाही.कुठेही आतंक पसरणार नाही किंवा एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करणार नाही,ज्यामुळे समाजामध्ये अस्वस्थता निर्माण होणार नाही. गांधीजींच्या मते सर्वोदय ही संकल्पना जर साकार झाली तर संपूर्ण विश्व एका कुटुंबाप्रमाणे अस्तित्वात येईल.

**५. स्वराज्य**

स्वराज्य हा शब्द सुशासन या अर्थाने घेतला जावा असे गांधीजी म्हणतात. गांधीजींच्या मते स्वराज्यात स्वातंत्र्याला आहे. आत्मनिर्भर तथा स्वायत्त ग्राम यांच्या स्थापनेबरोबरच गावातील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या विविध बाबींचा सरळ फायदा त्याला व्हावा, ज्या विविध सुधारणा आहेत त्या त्याच्यापर्यंत पोहोचवाव्या याला ते स्वराज्य असे नाव देतात. गांधीजींच्या मते, सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि लघु, सूक्ष्म कुटीरोद्योग यांची स्थापना व्हावी.मोठ्या उद्योगातून विषारी द्रव्य सर्वत्र पसरतात ज्यामुळे सर्वसामान्यांना आरोग्य हानी होते, त्यामुळे महामारी निर्माण होते अशा परिस्थितीमध्ये सबंध विश्वामध्ये आर्थिक मंदी येऊ शकते.त्यापेक्षा छोट्या-छोट्या आणि सूक्ष्म उद्योगांवर स्थानिकांनी लक्ष केंद्रित करावे असे झाल्यास ही संकल्पना फलदायी ठरेल.

### ६. स्वदेशी

स्वदेशी हा शब्द संस्कृत मधून घेतलेला आहे जो दोन शब्दापासून बनलेला आहे. 'स्व'याचा अर्थ स्वयं असा होतो तर 'देश' याचा अर्थ देश ही संकल्पना आहे.स्वदेशीचा शाब्दिक अर्थ आत्मनिर्भरता किंवा स्वदेशी वस्तूंविषयी असलेला आपला निर्मळ भाव.स्वदेशी अभियान हे भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाची चावी होती असे म्हणता येऊ शकेल.आज मात्र अमेरिका, चीन असे देश व्यापाराच्या माध्यमातून व कधीकधी युद्धाच्या माध्यमातून इतर देशांची अर्थव्यवस्था कमजोर करण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीमध्ये स्वदेशी ही संकल्पना घरगुती उद्योगांना आणि कारागिरांना वरदान ठरलेली आहे.

### सारांश

आज संपूर्ण जगामध्ये वर्तमान परिस्थितीमध्ये अस्थिरता दिसून येते.हिंसेच्या मार्गाने अनेक देश आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. अशा परिस्थितीमध्ये गांधीजींचे विचार जगाला विश्वशांतीकडे घेऊन जाऊ शकतात.गांधीजींचा राष्ट्रवाद वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेने प्रेरित झालेला आहे.त्यांच्या मते, राष्ट्राच्या हितापूरताच आपला राष्ट्रवाद मर्यादित न ठेवता राष्ट्रहिता बरोबरच विश्वकल्याण इथपर्यंत तो जाणे आवश्यक आहे. म्हणजे एका अर्थाने गांधीजींच्या विचारांमध्ये विश्वशांतीचा मार्ग दिसतो. म्हणून गांधीजींचे विचार हे शाश्वत आहेत, प्रत्येक काळामध्ये ते प्रासंगिक आहेत आणि आजच्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये तर ते अधिकच उपयोगी आहेत. गांधी विचारानेच जगामध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

### संदर्भ सूची

१. गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य - संपा. डॉ. द.दि. पुंडे, प्रतिमा प्रकाशन,१९९५.
२. लोकमान्य ते महात्मा - डॉ.सदानंद मोरे, राजहंस प्रकाशन,२००७.
३. हिंदी साहित्य मे गांधीवाद - चंद्रकांत बांदिवडेकर.
४. गांधी आख्यान माला भाग – १ - संपा.विष्णू प्रभाकर, संस्था साहित्य मंडल प्रकाशन, न्यू दिल्ली,२०१३.